**मा. महापौरजी यांच्या अध्यक्षतेखाली महिला व बाल कल्याण विशेष समितीची गुरूवार दिनांक 15.06.2017 रोजी दुपारी 12.30 वाजता मा.सभापती महिला व बालकल्याण यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.महापौरजी यांचेसह मा.सभापती सौ.वर्षा ठाकरे, मा.उपसभापती सौ.श्रध्दा पाठक, मा.सदस्या सौ. दिव्या धुरडे, मा.सदस्या, मा.सदस्या सौ.जिशान अंसारी, मा.सदस्या सौ.साक्षी राऊत, मा.सदस्या सौ.वैशाली नारनवरे आणि विशेष उपस्थिती मा.सदस्या सौ.निलिमाताई बावणे व कृषी किटकशास्त्रज्ञ श्रीमती संगिता सव्वालाखे तसेच विभागाकडून उपायुक्त(2)श्रीमती लाडे, उद्यान अधिक्षक श्री.माटे व बचत गटांच्या प्रतिनिधी उपस्थित होते.

मा.महापौरजी यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली. सुरूवातीला मा.महापौरजी यांचे सह सर्व उपस्थित मा.सदस्य आणि अधिकारी यांचे स्वागत करण्यात आहे. सुरूवातीला मा. महापौरजी यांनी सांगितले कि घरोघरी मोठया प्रमाणात गोळा होणा–या कच–याचे 5 जूनपासून ओला कचरा आणि सुखा कचरा अशाप्रकारे वर्गीकरण करून दोन वेगवेगळया डस्टबीनमध्ये कचरा वेगळा टाकण्यासंदर्भाने जनजागृती करण्यात येवून अभियान राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने झोन स्तरावर कार्यक्रम सुध्दा आयोजित करण्यात आले असून गोरगरीब जनतेला निशुल्क डस्टबीनचे वाटप सुध्दा करण्यात येत आहे असे सांगितले. तसेच त्यांनी ओला कचरा आणि सुखा कचरा कसा वेगवेगळा करायचा आणि ओला कच–याचा वापर करून चांगल्या प्रकारचे खत तयार कसे करता येवू शकते आणि कच–यापासून उत्पन्न कसे मिळविता येईल आणि यामुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुध्दा कशी सुधारू शकते याबद्दल माहिती सांगून हे प्रात्याक्षिकाद्वारे आलेल्या तज्ञ व्यक्तिकडुन सांगण्यात येईल असे त्यांनी सांगितले. शहरातील जनतेला याबाबत जागृत नागरिकाची भुमिका पार पाडण्याकरिता या अनुषंगाने शपथ सुध्दा घ्यावयाची आहे असेही मा.महापौरजी यांनी सुचित केले.

तद्नंतर मा.सदस्या श्रीमती बावणे यांनी सांगितले कि, स्वच्छ भारत अभियाना प्रमाणे नागपूर महानगरपालिकेकडून हा सुध्दा उपक्रम 5 जूनपासून राबविण्यात येत आहे. ओला कचरा आणि सुखा कचरा असे वर्गीकरण करून त्यांना वेगवेगळया डस्टबीनमध्ये टाकण्यात यावे.

ओल्या कच–यापासून नागरिकांना आपल्या फुलबागा, फळबागासाठी खत तयार करता येवू शकते तसेच बचत गटामार्फत अशाप्रकारे खत तयार करण्यात येवून विक्री सुध्दा करता येईल असे त्यांनी सांगितले.

कृषी किटकशास्त्रज्ञ श्रीमती संगिता सव्वालाखे यांनी सांगितले कि, सर्वांसाठी कचरा हा अतिशय गुंतागुंतीचा गंभीर विषय बनला आहे. शहरांमध्ये हा कचरा दोन प्रकारचा असतो. अविघटनशील व विघटनशील कचरा असे कच–याचे दोन प्रकार असतात. विघटनशील कचरा जाळून टाकण्यापेक्षा बायोडायनॅमिक पध्दत वापरून त्यापासून चांगल्या प्रतीचे कंम्पोस्ट खत परसबागेसाठी तयार करता येवू शकते. त्यानंतर त्यांनी ओल्या कच–यापासून घरगुती वस्तुंचा वापर करून खत बनवितांना कम्पोस्ट कल्चर टाकून कशा पध्दतीने कंम्पोस्ट खत बनविता येते यांचे प्रात्याक्षिकाद्वारे सविस्तर माहिती देवून सांगितले. बचत गटांनी अशाप्रकारे कंम्पोस्ट खत तयार करून विक्रीस आणल्यास त्यांना आर्थिक लाभ होईन आणि त्यांची आर्थिक उन्नती होईल तसेच शेती सुध्दा अशा सेंद्रीय खतामुळे पिकवली गेल्यास नागरिकांना सेंद्रीय भाजीपाला आणि धान्य मिळाल्यास आरोग्याचे प्रश्न उद्भवणार नाहीत तसेच शहरातील कच–याचा मोठा प्रश्न मार्गी लागू शकतो असेही त्यांनी सांगितले.

शेवटी सर्वांचे आभारप्रदर्शन करण्यात आले आणि तद्नंतर मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**महिला व बाल कल्याण विशेष समिति**

म.न.पा ठराव क्र. 8 दि. 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3), नुसार गठीत महिला व बालकल्याण समितीची सभा शुक्रवार दि. 30.06.2017 रोजी सकाळी 11.30 वाजता सिव्हील कार्यालयातील मा.सभापती यांच्या कक्षेत आयोजित केली त्या सभेतील चर्चेचे संक्षिप्त वृतांत.

सभेत मा. सभापती, महिला व बालकल्याण समिती, श्रीमती वर्षा ठाकरे मा.उपसभापती, श्रीमती श्रध्दा पाठक, मा.सदस्या तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव, मा.सदस्या श्रीमती दिव्या दिपक धुरडे, मा.सदस्या श्रीमती वंदना भानुदास भगत, मा.उपायुक्त तथा समाजकल्याण अधिकारी श्रीमती लाडे, मा.शिक्षणाधिकारी यांचेतर्फे श्री. संजय दिघोरे, शिक्षण विभाग व इतर कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली सभेच्या सुरुवातीस मा.सभापती यांनी विषयपत्रिकेवरील विषयास सुरुवात करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

1 महिला बचत गटांमार्फेत जैविक खत तयार करुन नागपूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागास पुरविण्याबाबत मा.सभापती यांनी सुचित केले की, नागपूर महानगरपालिकेच्या तिन मोठया उद्यानामध्ये महिला बचत गटांमार्फेत जैविक खत तयार करुन त्या उद्यानामध्ये पुरवावे या अनुषंगाने उद्यान अधिक्षक यांनी आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करावी.

2. महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातुन अनाथ मुलींच्या सामुहीक विवाहाचा कार्यक्रम घेण्याबाबत तसेच ऐअरहोस्टेस करीता प्रशिक्षण देण्याबाबतची योजना राबविण्याकरिता शासनामार्फेत फंड उपलब्ध करुन देण्यासंदर्भात मा.सभापती यांनी सुचित केले की, समितीच्या माध्यमातुन अनाथ व अपंग मुलींच्या सामुहीक विवाहाकरिता सर्वप्रथम सुरुवातीस 5 किंवा 10 जोडप्यांच्या विवाहाचा विचार करण्यात यावा व त्याच दिवशी मॅरेज सर्टीफिकेट त्यांना देण्यात येईल या अनुषंगाने सर्व कागदपत्रे त्यांच्याकडुन घेण्यात यावे तसेच ऐअरहोस्टेस करिता प्रशिक्षण देण्याकरिता त्यांना लागणारी शैक्षणिक अर्हतेनुसार प्रत्येक प्रभागातील ज्या गरीब आणि गरजु विद्यार्थी आहे त्यांचा शोध घेण्यात यावा ही योजना राबविण्याकरिता सदर प्रश्न समितीमार्फेत शासनाकडे फंड उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येईल.

७. महिला व बालकल्याण समितीव्दारा वृक्षरोपनाच्या कार्यक्रम तसेच वृक्ष रोपनासाठी महानगरपालिका मार्फत जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत मा.सभापती यांनी सुचित केले की उद्यान अधिक्षक यांच्याशी चर्चा करुन लवकरात लवकर वृक्षारोपनासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात यावी. तेथे वृक्षांची लागवड करुन त्यांचे संपुर्ण पालकत्व स्विकारण्यात यावे व त्या संदर्भात रिपोर्ट तयार करावा.

मा.सदस्या श्रीमती. यादव यांनी सुचित केले की, महानगरपालिकेतर्फे शिलाई मशीन बरोबरच लघुउद्योगाकरिता ज्या मशीन लागतात त्यांचे सुध्दा वाटप यावे तसेच मुलींना सक्षम करण्यासाठी प्रत्येक प्रभागात कराटे शिबीराचे आयोजन करण्यात यावे.

मा.सभापती यांनी सुचित केले की, जे मोठे महिला बचत गट आहे त्यांचे कामकाज कशाप्रकारे चालतात त्या कामाचे निरीक्षण करण्याकरिता अभ्यास दौ–यांचे आयोजन करण्यात यावे.

यानंतर मा.सभापती यांनी सभेचे समापन केले.

निगम सचिव
म.न.पा.नागपूर

सभापती,
महिला व बाल कल्याण विशेष समिती

**महिला व बाल कल्याण विशेष समितीची बुधवार दिनांक 9.08.2017 रोजी सकाळी 11. 30 वाजता भरलेल्या सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती सौ.वर्षा ठाकरे, मा.उपसभापती सौ.श्रध्दा पाठक, मा.सदस्या सौ. वंदना भगत, मा.सदस्या सौ.साक्षी राऊत, मा.सदस्या सौ.वैशाली नारनवरे तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

विषय क्र.1:– स्वंय सहायता महिला बचत गटांना महानगरपालिकेचे उद्यान प्रायोगिक तत्वावर करार करून जैविक खत तयार करण्याकरिता वापरण्यास देण्याबाबत चर्चा केली असता मा. सभापती यांनी सांगितले, जैविक खत तयार करण्याबाबतची कार्यशाळा घेण्यात आली होती त्यामध्ये असा विषय घेण्यात आला होता की महिला बचत गटांना स्वयंरोजगार मिळविता येईल या दृष्टीकोनातून म.न.पा.चे उद्यान जैविक खत तयार करण्याकरिता वापरण्यास दिल्यास तेथेच खत तयार होवू शकेल आणि खताचा वापर सुध्दा होईल तसेच विक्री सुध्दा होवू शकेल. जे जे बचत गट ज्या ज्या झोन कार्यालयाअंतर्गत येतात तेथील उद्यानात खत तयार करून त्याचा वापर तसेच विक्री करण्यास परवानगी देण्यात यावी. या विषयाला समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

विषय क्र.2:–महिला उद्योजिका मेळाव्याची पूर्व तयारी करण्याबाबत झालेल्या चर्चेत मा.सभापती यांनी सांगितले कि, मागच्या 7–8 वर्षापासून उद्योजिका मेळावा महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात येत आहे. या मागचा उद्‌देश हा की बचत गटांच्या माध्यमातून जे महिला उद्योजिका आहेत त्यांना एक चांगले व्यासपीठ मिळावे म्हणून हा उद्योजिका मेळावा प्रत्येक वर्षी डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात लावण्यात येतो. मागच्या वर्षी 350 स्टॉल देण्यात आले होते. करिता या वर्षी त्याची पूर्व तयारी करणे गरजेचे आहे. संबंधित अधिका–यांनी या विषयाच्या बाबतीतील पूर्व तयारी करणे अपेक्षित आहे. जानेवारी महिन्यात घेण्यात येणा–या मेळाव्याच्या नियोजनाच्या दृष्टीने येणा–या आठ दिवसात संबंधित सर्व अधिका–यांची बैठक लावण्यात यावी तसेच कस्तुरचंद ग्राऊंडवर मेळावा लावण्याची परवानगी सुध्दा मिळविण्याची प्रक्रिया सुरू

करण्यात यावी असे मा.सभापती यांनी निर्देशित करून याबाबत मा.सदस्यांकडून येणा–या सुचनांचा समावेश करण्यात येईल असे मा.सभापती यांनी सुचित केले.

मा.उप सभापती श्रीमती श्रध्दा पाठक यांनी या उद्योजिका मेळाव्याची शहरातील नागरिकांनी दखल घ्यावी यादृष्टीकोनातून विभागाकडून नियोजन करण्यात यावे तसेच सर्व बचत गटांचे या अनुषंगाने दोन दिवस कार्यशाळा ठेवण्यात यावी असे सुचविले.

शेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, महानगरपालिकेमार्फत मोठया स्तरावर उद्योजिका मेळावा घेण्यात येतो त्याच धर्तीवर झोन स्तरावर सुध्दा उद्योजिका मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे जेणेकरून सर्व बचतगटांना याचा फायदा पोहचेल असे सुचित करून सभा सभाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**महिला व बाल कल्याण विशेष समिती**

महिला व बाल कल्याण विशेष समितीची गुरूवार दिनांक 31.08.2017 रोजी सकाळी 11.30 वाजता डॉ.पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

सभेत मा.सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, मा.उपसभापती श्रीमती श्रध्दा पाठक, मा.सदस्या श्रीमती तारा यादव, मा.सदस्या श्रीमती दिव्या धुरडे, मा.सदस्या श्रीमती परिणिता फुके, मा. सदस्या श्रीमती वंदना भगत, मा.सदस्या श्रीमती साक्षी राऊत, मा.सदस्या श्रीमती वैशाली नारनवरे तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

विषय क्र.1:–महानगरपालिका फंडात महिला उद्योजिका मेळाव्याकरिता सन 2017–2018 या वित्तीय वर्षात रू. 50 लक्षाची तरतूद ठेवण्यात आली आहे. महिला उद्योजिका मेळावा हा कार्यक्रम विदर्भ स्तरावर आयोजित करण्यात येणार असल्यामुळे शासनाकडून फंड मागविण्याबाबत चर्चा करून या विषयाला समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

श्रीमती वैशाली नारनवरे यांनी चर्चेदरम्यान विचारणा केली की महिला उद्योजिका मेळाव्याच्या अनुषंगाने अपंग महिलांच्या क्रिडा स्पर्धा घेवू शकतो काय? यावर मा.सभापती यांनी मेळाव्या दरम्यान दुपारच्या वेळेस ज्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात येतात त्या दरम्यान ज्या क्रिडा स्पर्धा आपण घेवू शकतो त्या निश्चितच घेण्यात येतील असे आश्वासन दिले. श्रीमती वंदना भगत यांनी मेळावा दरम्यान महिलांसाठी राबविण्यात येणार कार्यशाळेसोबत परिसंवादाचे सुध्दा आयोजन करण्यात यावे असे सुचित केले. मा. उप सभापती श्रीमती श्रध्दा पाठक यांनी ज्या महिलांना उद्योग सुरू करावयाचा आहे त्यांना त्यांच्या उद्योगाशी संबंधित संपुर्ण प्रक्रियेचे प्रशिक्षण देण्याविषयी सुचविले. महिला बाल कल्याण समितीमार्फत महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी ज्या शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे ते फक्त बीपीएल यादीतील किंवा संवर्गात असलेल्या महिलांनाच वाटप न करता सर्वसामान्य गरजू, गरीब महिलेला सुध्दा वाटप करण्यात यावेत तसेच बीपीएल यादीचा नव्याने सर्व्हे करण्यात यावा असे सुचित केले. या विषयाच्या अनुषंगाने समितीच्या सभेत संबंधित अधिका–याच्या उपस्थितीत या विषयावर चर्चा करण्यात येईल असे मा.सभापती यांनी सुचित केले.

त्यानंतर मा.सभापती यांनी सांगितले कि, महिला उद्योजिका मेळावा हा साधारणतः 7 ते 14 जानेवारी या दरम्यान घेण्यात येईल. यात विदर्भातील महिला गटांचा सहभाग लाभल्यास सर्व महिला गटांना त्याचा मोठया प्रमाणात फायदा होईल. सर्व कार्यक्रमाची रूपरेषा इवेन्ट मॅनेजमेंट कडून ठरवून घेण्यात येईल. या मेळाव्याच्या अनुषंगाने एक समिती स्थापन करण्यात येवून त्या समितीद्वारे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येईल. या वर्षी कस्तुरचंद पार्क येथे मेळावा घेता येणार नाही करिता यशवंत स्टेडियम किंवा रेशिमबाग या जागी मेळाव्याकरिता परवानगी घेण्यासाठी विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे असेही त्यांनी सांगितले.

वेळेवर उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने मा.सभापती यांनी महाराष्ट्र शासनाकडून सामुहिक विवाहसंदर्भात आलेली योजना आणि येणा–या निधीच्या संदर्भात सर्व नगरसेवकांनी आणि समिती सदस्यांनी आपआपल्या प्रभागातील ज्या गरीब आणि गरजू मुली किंवा अनाथ असलेल्या मुलीचे लग्न जुळलेले आहे. ज्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे अशा जोडपांची यादी विभागाच्या संबंधित अधिका–याकडे सादर करावी जेणेकरून त्याचा फायदा त्यांना मिळवून देता येईल. याकरिता आवश्यक असणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे आहेत. सामुहिक विवाह सोहळयाकरिता वधु–वरांसाठी लागणारे आवश्यक कागदपत्रांमध्ये वधु–वर यांचे 2–2 पासपोर्ट साईज फोटो, वधु–वर यांचे लिव्हीग सर्टीफिकेट(Leaving Certificate), आधार कार्ड, निवडणूक कार्ड, नगरसेविकाचे महिला व बालकल्याण सदस्यांचे शिफारसपत्र, इलेक्ट्रिक बील, उत्पन्नाचा दाखला, वधु–वर यांचे आई–वडील/पालक यांचे हमीपत्र, आई/वडील किंवा वधु च्या स्व:तच्या नावाचे बॅक पासबुकची झेरॉक्स प्रत, रू.100 चा स्टॅम्प पेपर प्रतिज्ञापत्र बाल विवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंध कायदया वर्गात असलेल्या कोणत्याही कलमाचे भंग या दाम्पत्य/कुटुंब यांचे कडुन झालेला नसावा प्रतिज्ञापत्र ॲफीडेव्हीट(Affidavit) सादर करणे आवश्यक आहे. डोमीसाईल(Domicile certificate) महाराष्ट्र राज्यांचा रहिवासी दाखला, नगरसेवकाचे शिफारस पत्र, विवाह नोंदणी Certificate त्यांना मनपा मार्फत देणे, मुलींच्या वस्तीगृहामधुन विवाहाकरीता अनाथ व अत्यंत गरीब कुटुंबातील मुलींचे नावे देण्याकरिता त्यांना मा.सभापती महिला व बाल कल्याण समिती यांनी पत्र देण्याबाबतचा प्रस्ताव, लाभार्थ्यांना वैयक्तिक अर्ज विभागाच्या नावाने देणे आवश्यक आहे असेही मा.सभापती यांनी सुचित करून सभा सभाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**महिला व बाल कल्याण विशेष समिती**

**महिला व बाल कल्याण विशेष समितीची शुक्रवार दिनांक 27.10.2017 रोजी दुपारी 3.00 वाजता मा.सभापती महिला व बालकल्याण यांच्या कक्षात भरलेल्या सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, मा.सदस्या श्रीमती दिव्या धुरडे, श्रीमती वंदना भगत, तसेच विभागाकडून उपायुक्त(1)श्रीमती लाडे, व अखिल भारतीय स्थानिक संस्थेचे प्रतिनिधी आणि इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत करुन सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

कोरम अभावी सभा 10 मिनिटाकरिता स्थगित करण्यात आली.

**निगम सचिव**
**म.न.पा.नागपूर**

**सभापती**
**महिला व बाल कल्याण समिती**

**महिला व बाल कल्याण विशेष समितीची शुक्रवार दिनांक 27.10.2017 रोजी दुपारी 3.30 वाजता मा.सभापती महिला व बालकल्याण यांच्या कक्षात भरलेल्या स्थगित सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, मा.सदस्या श्रीमती दिव्या धुरडे, मा.सदस्या, श्रीमती परिणिता फुके, मा.सदस्या श्रीमती वंदना भगत, मा.सदस्या श्रीमती वैशाली नारनवरे, तसेच विभागाकडून उपायुक्त(1)श्रीमती लाडे, व अखिल भारतीय स्थानिक संस्थेचे प्रतिनिधी आणि इतर उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

1.श्री.जयंत पाठक(संचालक – (All India Institude) यांच्यामार्फत महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्यांकरिता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती म.न.पा.तील सर्वपक्षीय महिला सदस्यांकरिता तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम तेलंगाणा राज्याची राजधानी हैद्राबाद येथे आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. पहिल्या दिवशी तेथील बचतगटांच्या कार्यशाळांना भेट देणे, दुस–या दिवशी तज्ञ व्यक्तिद्वारे प्रशिक्षण आणि तिस–या दिवशी कामासंदर्भात स्थळांना भेट देवून माहिती घेणे अशा प्रकारे कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम 30 नोहेंबर ते 4 डिसेंबर या कालावधीत घेण्याचे ठरले. या विषयाला समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

2.नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागामार्फत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने उमेट–नागपूर वर्धीनी विक्रीकेंद्र लक्ष्मीभवन, मधुमाधव टॉवर, गाळे क्र.3, 4, 5, मध्ये सुरू करण्यात आले आहे. सदर विक्रीकेंद्रात स्वंय सहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या आहेत. उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या आहेत. उत्पादित केलेल्या वस्तुंचा साठा पुरेसा झाल्यानंतर येणा–या काही दिवसात विभागामार्फत विक्रीकेद्रांचे रितसर उद्घाटन करण्यात येईल. या विषयावर निर्णय घेवून प्रस्ताव पारित करण्याबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान प्रतिनिधी मार्फत सांगण्यात आले की बचत गटांमार्फत येणा–या वस्तूंचे व्यवस्थित पध्दतीने पॅकिंग केली जात नसल्यामुळे बचत गटांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे जेणेकरून त्यात त्यांना वस्तुचे पॅकिंग चांगल्या पध्दतीने कसे केले जावे याचे प्रशिक्षण दिले जाईल. तसेच त्यांच्याकडून जास्तीत जास्त वस्तू मागविण्यात येत आहे. या अनुषंगाने झालेल्या चर्चेअंती प्रस्ताव पारित करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

3. जीवन तरूण विमा योजने अंतर्गत 0ते1 वर्ष वयोगटातील मुलींचा विमा काढण्याबाबत ठराव पारित झालेला असून 1 वर्ष पूर्ण झालेले लाभार्थी मुलींचे प्रस्ताव विभागास प्राप्त झालेले आहे. सदर विषयावर निर्णय घेवून प्रस्ताव पारित करण्याबाबत चर्चा केली. विभागास प्राप्त 200 प्रकरणांत लाभार्थ्यांच्या वयोमर्यादेत वाढ झाली आणि त्यामुळे प्रत्येकी लाभार्थ्यांच्या विमा हप्त्यात 192 रू.ची वाढ होत आहे याप्रमाणे 35 हजार रू. विमा कंपनीला देणे असल्यामुळे हा प्रस्ताव आलेला आहे. बीपीएल लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळावा करिता समितीने प्रस्तावास एकमताने मंजुरी प्रदान केली.

4. महिला उद्योजिका मेळाव्याबाबत चर्चा केली असता विभागामार्फत सांगण्यात आले कि रेशिमबाग मैदानावर महिला उद्योजिका मेळावा आयोजित करण्याबाबत अनुमती मागण्याचा प्रस्ताव प्रक्रियेत असून लवकरच त्यावर निर्णय होईल. त्यानंतर निविदा प्रक्रिया करण्यात येईल. 20 जानेवारी ते 28 जानेवारी दरम्यान महिला उद्योजिका मेळावा आयोजित करण्याचे ठरविण्यात आले असून या मेळाव्यात आजूबाजूच्या शहरी, ग्रामीण बचत गटांना सुध्दा आमंत्रित करण्यात येईल असे समितीत ठरविण्यात आले.

5.वेळेवर येणा–या विषयात स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत माऊंटटाबू येथे 8 नोहेंबर ते 9 नोहेंबर या दरम्यान आयोजित करण्यात येणा–या कार्यशाळात समितीच्या सदस्यांना सुध्दा आमंत्रित करण्यात आलेले आहे. करिता इच्छुक मा.सदस्यांनी समितीला कळवावे असे समितीमार्फत सांगण्यात आले.तद्नंतर मा.सभापती यांच्या अनुमतीने सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **सभापती** |
| **नागपूर महानगरपालिका,नागपूर** | **महिला व बाल कल्याण विशेष समिती** |

महानगपालिका ठराव क्र 8 दिनाक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30 –3 नुसार गठीत महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली होती त्या समीतीची सभा बुधवार दिनांक 29.11.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा. सभापती श्रीमती वर्षा जयंत ठाकरे ,श्रीमती श्रध्दा विजय पाठक उपसभापती, श्रीमती वंदना भानुदास भगत, श्रीमती जिशान मुमताज मो. इरफान अंसारी, सदस्या श्रीमती वैशाली अविनाश नारनवरे सदस्या उप निगम आयुक्त श्रीमती रंजना लाढे, शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली सभेसमोर असणा–या विषयपत्रिकेतील विषय क्रमांक 1 नुसार समुह संघटक यांना महिला व बालकल्याण समितीतर्फे मानधन अदा करण्याबाबत विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी विभागाने समुह संघटकाना शासनातर्फे वेतन देण्यात येते. परंतु समाजकल्याण विभागाद्वारे येणारे काम जसे की लाडली लक्ष्मी योजना, ई–रिक्षा, महिला दिन, महिला उद्योजिका मेळावा, झोन अंतर्गत येणारे काम करीत असतात. तसेच अन्य महानगरपालिकेत हया विषयाच्या संदर्भात काय स्थिती याची माहिती घेणे योग्य होईल असे सुचविण्यात आले. यावर समितीने या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करुन यावर निर्णय घेण्यात येईल असे ठरविण्यात आले.

विषय क्रमांक 2 नुसार वेळेवर येणारे विषय या संदर्भात पिको फॉल काचबटन मशीन वाटपाचे विषय संदर्भात चर्चा करण्यात आली या वेळी विभागातर्फे माहीती देण्यात आली की या करीता 40 लक्ष रुपयाचे प्रावधान ठेवण्यात आले आहे. मशीन वाटपा संदर्भात प्रत्येक माननीय सदस्यांन तर्फे 2 सदस्यांचे शिफारस समितीकडे घेवून त्यानुसार मशीन देण्याचे प्रस्तावित करण्यात येईल याप्रमाण विभागाने आवश्यक कार्यवाही करावी असा निर्णय समितीव्दारे सभेत घेण्यात आला.

शुभमंगल सामुहिक विवाह करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आली यात 25 वधु वरांचे विवाह यात करण्यात यावे तसेच यात जोडपे निवडी करीता मागील सभेत निश्चित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी या संदर्भात विभागाने नियोजन करुन समितीसमोर प्रस्ताव दयावा असा निर्णय घेण्यात आला.

महानगरपालिकेच्या शाळेत सॅनेटरी नॅपकीन मशीन लावण्याबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी विभागाव्दारे सांगण्यात आले की यापुर्वी 10 शाळेत मशीन लावण्यात

आलेल्या आहे 19 तसेच शाळेत लावावयाच्या आहे. त्यावर समितीने उर्वरित शाळेत मंशीन लावण्याची  कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेतला.

महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यापर्यंत आरोग्य प्रतीपुर्ती करीता (मेडीकल क्लेम) सुविधा देणेबाबत च्या विषयावर चर्चा करण्यात आली यात मेडीकल क्लेम ची प्रतिपुर्ती करणे शक्य होणार नाही करीता वय गटानुसार , वर्गानुसार ग्रृप इंशोरस पॉलीसी करुन दिल्यास तसेच या करीता मेडीकल कार्ड ची व्यवस्था असल्यास तसेच यात लाईफ इंशोरस समाविष्ठ असल्यास सोबत पाल्याचे लाईफ इंशोरस असल्यास योग्य होईल त्यानुसार माहिती काढून प्रस्ताव देण्यात यावा असा समितीने निर्णय घेतला.

यानंतर सभेचे समापन करण्यात आले.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती,
महिला व बालकल्याण समिती

महिला व बाल कल्याण विशेष समितीची सभा सोमवार दि. 08/01/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता सिव्हील कार्यालयातील स्व.डॉ.पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

सभेत मा.सभापती श्रीमती वर्षा ठाकरे, मा.उपसभापती श्रीमती श्रध्दा पाठक, मा.सदस्या श्रीमती दिव्याताई धुरडे, मा.सदस्या श्रीमती साक्षी राऊत, मा.सदस्या श्रीमती वैशाली नारनवरे, मा.सदस्या श्रीमती वंदना भगत, मा.सदस्या श्रीमती जिशान अंन्सारी, तसेच प्रशासनाकडुन मा.उपायुक्त श्रीमती लाडे, आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी डॉ. जोशी, शिक्षण अधिकारी यांचे प्रतिनिधी, समाज कल्याण अधिकारी व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी सभेत उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली.

विषय क्र 1 :— नागपूर महानगरपालिके अंतर्गत सफाई कर्मचाऱ्याकरिता आरोग्य शिबीर राबविण्याबाबत मा.उपायुक्त श्रीमती लाडे यांनी सुचित केले की, आरोग्य विभागातर्फे सफाई कर्मचा—यांचे नुसते कागदोपत्री शिबीरे न घेता त्यांना लाईफ लॉग आरोग्य सुविधा मिळविण्याच्या दृष्टीकोणातुन स्मार्ट लाईफ लॉग कार्ड बनविण्यात यावे जेणेकरुन त्यांना पुर्ण लाईफकरीता आरोग्य विषयक सोयीसुविधा प्राप्त होईल व ही प्रक्रीया निरंतर चालण्याच्या अनुषंगाने यामध्ये जे इनडोअर डॉक्टर्स आहे त्याची या आरोग्य शिबीरमध्ये मदत घ्यावी यामध्ये सर्वच रोगाची तपासणी करण्यात यावी, सर्व सफाई कर्मचा—याकरीता सक्तीचे शिबीर राहील जेणेकरुन सफाई कर्मचा—यांना त्याचा लाभ मिळेल, या दृष्टीकोणातुन आरोग्य विभागाने पाच दिवसाच्या आत प्रस्ताव तयार करावा.

आरोग्य विभागातर्फे झोननिहाय किती सफाई कर्मचारी आहे व व आरोग्य शिबीर आयोजित करणा—या दवाखान्यांचे नावे सभेत सांगण्यात आले.

मा.सदस्या श्रीमती वंदना भगत यांनी सांगितले की, या शिबीरामध्ये महिला सफाई कर्मचा—यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोणातुन ब्रेस्ट कॅन्सरची तपासणी तसेच अस्थिगणना शिबीर सुध्दा घेण्यात यावे असे सांगण्यात यावे.

मा.सदस्या श्रीमती दिव्या धुरडे यांनी सुचित केली की, आरोग्य विभागातर्फे जे शिबीर घेण्यात येईल त्याच्या प्रचार व प्रसाराकरीता झोनमध्ये बॅनर लावण्यात यावे, तसेच सफाई कर्मचा—यांच्या हजेरी स्टॅन्डवर सुध्दा या संदर्भात जनजागृती करण्यात यावी.

मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी निर्देशित केले की, सफाई कर्मचा—यांना लाईफ लॉग सुविधा मिळण्याच्या दृष्टीकोणातुन स्मार्ट लाईफ लॉग कार्ड तयार

करुन त्यांना आरोग्य विषयक सोयीसुविधा मिळण्याच्या दृष्टीकोणातुन आरोग्य विभागाने पाच दिवसाच्या आत प्रस्ताव तयार करुन पुढील कार्यवाही लवकरात लवकर करावी.

विषय क्र 2 काचबटन व पिको–फॉल मशीन मिळण्याबाबत मा.सभापती यांनी (पिको–फॉल) शिवणयंत्र वाटपबाबतचे निकषांचे वाचन केले

1 प्रत्येक प्रभागातील गरीब व गरजु, विधवा महिलांना या योजनांचा लाभ घेता येईल. यासाठी त्या प्रभागातील मा.नगरसेवक/नगरसेविकाचे शिफारसपत्र असावे,

2 ती महिला बी.पी.एल. धारक किंवा राशन कार्ड असणे आवश्यक आहे.

3. मा.नगरसेवक/मा.नगरसेविका यांच्याकडील प्रत्येकी 2 लाभार्थ्यांना अशा एकूण 156 नगरसेवक/नगरसेविका मार्फत 312 मशीन वाटप करावयाच्या आहे. याव्यतिरिक्त आलेल्या अर्जाचा निर्णय घेण्याचा अधिकार महिला व बाल कल्याण समितीस राहील.

4. या महिलेकडे टेलरिंगचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र किंवा शिलाईकाम करत असल्याचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

5. जर महिला विधवा असेल तर तिच्याकडे तिच्या पतीचे मृत्युप्रमाणपत्र असावे.

6. जर महिला परितक्ता/घटस्फोटीत असेल तर तिच्याकडे घटस्फोटाचे प्रमाणपत्र असावे.

7. त्या महिलेकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने सर्व महिला सदस्यांनी आपल्या प्रभागातील लाभार्थ्यांचे नाव लवकरात लवकर पाठविण्याचे आव्हान केले.

वेळेवर उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने स्मार्ट कार्ड स्वयंचलित सॅनेटरी नॅपकीन व्हेंडींग मशीनच्या संदर्भात शिक्षण विभागातर्फे लावण्यात येणा–या माध्यमिक शाळेतील वर्ग 5 ते 12 वी मध्ये असणा–या विद्यार्थीनी पटसंख्येची माहिती देण्यात आली. त्यामध्ये एकूण 19 शाळेतील 1276 विद्यार्थीनी असल्याचे सांगण्यात आले. स्वयंचलित सॅनेटरी नॅपकीन व्हेडींग मशीनच्या संदर्भात माहिती देतांना सांगितले की, प्रत्येक मशीन सोबत एक ऑपरेटर देण्यात येईल एक वर्षाकरीता ऑपरेटर व मेंटेनन्सचा निधी ही म.न.पा देईल परंतु एका वर्षानंतर विद्यार्थ्यांना त्यामध्ये कार्ड देवुन त्यामध्ये त्यांना रिचार्ज करावा लागेल, पुणे महानगरपालिका व मुंबई महानगरपालिका मध्ये अशा 250 मशीन लागल्या असल्याची माहिती देण्यात आली.

या संदर्भात मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी निर्देशित केले की, सद्यास्थितीत प्रायोगीक तत्वावर युज अॅन्ड डिस्ट्रॉय सॅनेटरी नॅपकीन व्हेंडींग मशीन अशा दोन मशीन लावण्याकरीता महिला व बालकल्याण समितीने यास मंजूरी प्रदान केली.

10 लक्ष रुपयांचा मेडीक्लेम पॉलिसीच्या अनुषंगाने शिक्षण विभागातर्फे माहिती देण्यात आली त्यावर मा.सभापती यांनी निर्देशित केले की, स्लम घोषित शाळामधील मुलामुलींकरीता मेडीक्लेम पॉलिसी काढण्याकरीता शिक्षण विभागातर्फे लवकरात लवकर **EOI** काढावा.

श्रीमती चित्रा लोखंडे, समुदाय संघटिका, गांधीबाग झोन क्र. 6 येथे कार्यरत असुन 16 ऑक्टोबर पासुन त्या मॅटर्निटी लिव्हवर असुन रजा कालावधीतील मानधन त्यांना मिळण्याबाबत महिला व बालकल्याण समितीमध्ये शिफारस करण्यात आली होती त्या अनुषंगाने मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी निर्देशित केले की, सर्व शिक्षा अभियानामध्ये मॅटर्निटीची लिव्हसंदर्भात जी पॉलिसी आहे त्या पॉलिसीच्या अंतर्गत प्रशासनाने यावर योग्य तो निर्णय घ्यावा.

महिला उद्योजिका मेळावा 4 फेब्रुवारी ते 11 फेब्रुवारी 2018 दरम्यान रेशीमबाग मैदान येथे आयोजनाचा अनुषंगाने सदर मेळाव्यातील आयोजन व इतर आवश्यक व्यवस्थेबाबतचे कार्य एकाच ईव्हेंट मॅनेजमेंन्ट संस्थेव्दारे करण्याचे निर्देश देवुन मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव,
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती,
महिला व बाल कल्याण विशेष समिती